**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०५.२०)**

**मंगळवार दिनांक १३ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हवाईदल जवानांशी संवाद, पंजाबमधे आदमपूर इथं हवाईदलाच्या तळाला भेट.**
2. **कृत्रिम वाळू धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी, राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या महाराष्ट्रातल्या उपकेंद्रासाठी नागपूर जिल्हयातल्या चिंचोली इथं सुमारे २० हेक्टर जागा.**
3. **महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या १०वीच्या परीक्षेचा निकाल जाहीर, नागपूर विभागाचा निकाल ९० पूर्णांक ७८ टक्के, तर गडचिरोलीचा निकाल ८२.६७ टक्के.**
4. **ॲग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत ३१ मे पर्यंतपूर्ण नोंदणी करावी, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे शतकर्त्यांना आवाहन.**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी-जवान भेट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पंजाबमधे आदमपूर इथं हवाईदलाच्या तळाला भेट दिली आणि तिथं हवाई दलाच्या जवानांशी संवाद साधला. सेनादलांच्या जवानांबद्दल देशाला कृतज्ञता असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. आणि जवानांचं मनोबल वाढवलं......

***आप सभी ने कोटि कोटि भारतीयों का सीना चौड़ा कर दिया है, आपने इतिहास रच दिया है। आज से अनेक दशक बाद भी जब भारत के इस पराक्रम की चर्चा होगी, उसके सबसे प्रमुख अध्याय आप और आपके साथी होंगे। आप सभी वर्तमान के साथ ही देश की आने वाली पीढ़ियों की और उनके लिए भी नई प्रेरणा बन गई । मैं वीरों की इस धरती से आज एयरफोर्स, नेवी, आर्मी के सभी जांबाजों बीएसएफ के अपने शूरवीरों को सैल्यूट करता हूँ।***

भारत न्यूक्लियर ब्लॅकमेलिंग सहन करणार नाही तसेच दहशतवादाला सडेतोड उत्तर दिले जाईल असे मोदी यांनी आपल्या संबोधांत स्पष्ट केलं. दरम्यान, यावेळी त्यांनी तिथल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रधानमंत्र्यांना सद्यस्थिती विषयी सविस्तर माहिती दिली.

**अतिरेक्यांना कंठस्नान**

जम्मू काश्मीरच्या शोपिया जिल्हयात सुरक्षा दलाच्या जवानांनी तीन अतिरेक्यांना आज सकाळी कंठस्नान घातले. शोपिया जिल्हयाच्या शुक्रू केलर जंगलात अतिरेकी लपले असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलाच्या जवानांनी या परिसराला घेराव घातला. सुरक्षा दल तेथे पोहोचताच अतिरेक्यांनी बेछूट गोळीबार सुरू केला. प्रत्यूत्तरात सुरक्षा दलांनी केलेल्या गोळीबारात तीन अतिरेकी ठार झाले.

**मंत्रिमंडळ निर्णय**

कृत्रिम वाळू धोरणाला आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी मिळाली. याअंतर्गत प्रत्येक जिल्हयात ५० व्यक्ती किंवा संस्थांना कृत्रिम वाळू युनिट स्थापन करण्यासाठी उद्योग विभाग सवलती देणार आहे. तसंच या युनिट्सना २०० रुपये प्रति ब्रास इतकी सवलतही मिळणार आहे. राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या महाराष्ट्रातल्या उपकेंद्रासाठी नागपूर

जिल्ह्यातल्या चिंचोली इथं सुमारे २० हेक्टर इतकी जागा द्यायचा निर्णय मंत्रिमंडळानं आज घेतला. तसंच, रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरतं पथक योजनेलाही राज्य मंत्रिमंडळानं हिरवा कंदील दाखवला. या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात २९ महापालिका क्षेत्रांमध्ये ३१ मोबाईल व्हॅनसाठी सुमारे ८ कोटी रुपयांच्या खर्चालाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पबाधितांना होम स्वीट होम अंतर्गत वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्ट्याच्या दस्तऐवजावरचं मुद्रांक शुल्क कमी करून फक्त एक हजार रुपये आकारायचा निर्णयही राज्य मंत्रिमंडळानं घेतला. राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवालही मंत्रिमंडळानं आज स्वीकारला. यापैकी ८० कोटी रुपयांचा भार राज्य सरकार स्वीकारणार आहे. राज्यातल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचं सार्वजनिक-खासगी भागीदारीतून अद्ययावतीकरणासंदर्भातलं धोरण राज्य मंत्रिमंडळानं स्वीकारलं.

**मुख्यमंत्री**

कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ, नागपूर आणि ॲम्युचअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित देवाभाऊ राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचा बक्षिस समारंभ वर्धा इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल पार पडला. या स्पर्धेत देशभरातील एकूण २७ पुरुष संघ आणि २२ महिला संघ सहभागी झाले होते. जम्मू काश्मीर, लडाख या भागातील स्पर्धकांचाही यात समावेश होता. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी वर्धा इथल्या सावरकर स्मारक उद्यानास भेट देऊन त्यांच्या पुतळ्यास अभिवादन केलं. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी स्वातंत्र्याच्या लढ्याला एक वेगळी कलाटणी दिली. त्यांची विज्ञाननिष्ठता नवीन पिढीमध्ये रुजवता आली पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न सर्वांनी एकत्रिपणे करणं गरजेचं असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत वर्धा इथं सेवा पंधरवड्याचा समारोप तसंच उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय इमारतींचं लोकार्पणही करण्यात आलं.

**सीबीएसीई १२वीचा निकाल जाहीर**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं इयत्ता १२ वीचा निकाल आज जाहीर केला. यावर्षी ८८ पूर्णांक ३९ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा निकालाच्या टक्केवारीत किरकोळ वाढ झाली आहे. यावर्षीही मुली उत्तीर्ण होण्याचं प्रमाण अधिक आहे. यंदा सीबीएसईच्या १२ वी च्या परीक्षेला एकूण १६ लाख ९२ हजार ७९४ विद्यार्थी बसले होते. विद्यार्थ्यांना त्यांचा निकाल cbse.gov.in, results.nic.in, results.digilocker.gov.in या संकेतस्थळांवर बघता येईल.

**दहावीचा निकाल**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा म्हणजेच इयत्ता दहावीचा निकाल आज मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पुण्यात जाहीर केला. यंदा या परीक्षेत ९४ पूर्णांक १० शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यावर्षीही मुलांच्या तुलनेत मुली उत्तीर्ण होण्याचं प्रमाण अधिक आहे. नागपूर विभागाच्या निकालाची टक्केवारी ९० पूर्णांक ७८ शतांश टक्के इतकी आहे. यात गडचिरोली जिल्ह्याचा निकाल ८२.६७ टक्के लागला आहे. नागपूरच्या अक्षरा गायधने नी सातत्यपूर्ण अभ्यासाला आपल्या यशाचे श्रेय दिले आहे....

***मि स्टार्टिंग पासून  अभ्यास केला होता दहावीचा एकही दिवस अभ्यासाला सूट नाही दिली. रोज जितकं  शिकवलं गेलं  रोज तितकं रिवाईज  केलं. मी सकाळी सहा वाजता उठायची आणि अभ्यास करायाची देण स्कूलला जायची, स्कूलवरून आल्यावर स्कूलचे जे होमवर्क राहायचं ते करायचं, जे शिकवलं ते रिवाईज करायचं ऍण्ड देन सेल्फ स्टडी.***

दहावीच्या नियमित परीक्षेसाठी यंदा राज्यातील नऊ विभागीय मंडळातून १५ लाख ४६ हजार ५७९ नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १४ लाख ५५ हजार ४३३ जण उत्तीर्ण झाले आहेत. गेल्यावर्षी पेक्षा यंदाच्या निकालात १ पूर्णांक ७१ शतांश टक्क्यांनी घट झाली आहे.

**बावनकुळे**

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणाहून देण्यासाठी ॲग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत ३१ मे पर्यंतपूर्ण नोंदणी करावी, असे निर्देश मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. बावनकुळे यांनी नागपूर इथून  दूरदृष्य प्रणालीद्वारे खरीप हंगामाचा आढावा घेतला. ही नोंदणी केली नसलेल्या शेतकऱ्यांना वीज बिलाची सवलत मिळणार नसून ॲग्रीस्टॅक नोंदणी नसणाऱ्या शेतकऱ्यांना जुलैपासून विजबिल देण्यात येईल असं त्यांनी सांगितलं

**जिल्हाध्यक्षांची घोषणा**

भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेशनं राज्यातील विविध संघटनात्मक जिल्ह्यांसाठी नवीन जिल्हाध्यक्षांची घोषणा केली आहे. नागपूर महानगराचे नवीन जिल्हाध्यक्ष म्हणून माजी महापौर दयाशंकर तिवारी  यांची निवड करण्यात आली आहे  तर नागपूर ग्रामीण रामटेक चे अनंत राऊत आणि नागपूर ग्रामीण काटोलच्या अध्यक्षपदी मनोहर कुंभारे यांची निवड करण्यात आली आहे.

**हवामान**

पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या हलक्या पावसासह वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.  यात चंद्रपूर इथं  उद्या तुरळक ठिकाणी वादळी वारा आणि मेघगर्जनेसह पर्जन्यवृष्टी होऊ शकते त्यामुळे इथं ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आलाय. त्याचप्रमाणे पश्चिम विदर्भात आज सर्व जिल्ह्यांमध्ये येलो अलर्ट तर उद्या यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्यामध्ये उद्या ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.  दरम्यान गेले काही दिवसांपासून सातत्याने कमी अधिक प्रमाणात पाऊस आणि वादळी पर्जन्यमान असल्यामुळे कमाल तापमानात घट झाली आहे.  अकोला इथं सर्वाधिक कमाल तापमान 40 पूर्णांक सहा अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं तर,  नागपूर इथं  35. 9 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

**आयपीएल**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ-बीसीसीआयनं आयपीएल स्पर्धेचं सुधारित वेळापत्रक जाहीर केलं आहे. या वेळापत्रकानुसार येत्या शनिवारी म्हणजे १७ मे पासून पुन्हा एकदा आयपीएल स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

**पदभरती**

राज्य परिवहन महामंडळात चालक तथा वाहक पदा बरोबरच अन्य काही वर्गातील पदांची येत्या काही वर्षात भरती केली जाणार आहे. त्याबाबतच्या ठरावाला नुकतीच संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. त्यामुळे सध्या रिक्त असलेल्या अभियंत्यांच्या जागा करार पद्धतीने आणि सरळ सेवा भरतीच्या माध्यमांतून भरण्यात येणार आहेत असं ते म्हणाले. नव्या नोकर भरतीच्या अनुषंगाने एसटीच्या प्रत्येक खात्याने आपल्या विभागातील रिक्त पदांचा फेर आढावा घेऊन आवश्यक असणाऱ्या पदांची भरती करण्यासंदर्भात एकत्रित मागणी सादर करावी, असे निर्देश देण्यात आल्याची माहिती यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

**मुंबई विद्यापीठ**

मुंबई विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचं वेळापत्रक मुंबई विद्यापीठामार्फत जाहीर करण्यात आलं आहे. ही पदव्युत्तर अभ्यासक्रमांची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात येत आहे.मुंबई विद्यापीठाच्या **<https://mu.ac.in/admission>** या संकेतस्थवळावर विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करता येईल. प्रवेश नोंदणी ते अर्ज सादर करण्याची प्रक्रिया समजून घेण्यासाठी संकेतस्थळावर व्हिडिओ लिंक देण्यात आली आहे. प्रवेश प्रक्रियेमध्ये ऑनलाईन नाव नोंदणी आणि प्रवेश अर्ज १३ मे ते ३ जून २०२५ सादर करावेत, असं आवाहन परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ.पूजा रौंदळे यांनी केलं आहे.

*******